# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): पिंपरी-चिंचवड **P.S.**(ठाणे): भोसरी एम.आय.डी.सी.
   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0407 **Year** (वर्ष): 2025
   **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):16/07/2025 16:15

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
   1. **Day**(दिवस): दरमियानी दिन
      **Time Period** (कालावधी):
      **Date From** (दिनांक पासून): 14/07/2025
      **Date To** ( दिनांक पर्यंत): 15/07/2025
      **Time From** (वेळेपासून): 15:06 बजे
      **Time To** (वेळेपर्यंत): 21:20 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
   **Date** (दिनांक ): 16/07/2025 **Time** (वेळ): 15:00 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
   **Entry No.** (नोंद क्र.): 033
   **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 16/07/2025 16:15 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
   1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
   उत्तर, 01 किमी **Beat No.** (बिट क्र.):
   (b) **Address** (पत्ता): भोसरी अँकर्ड हस्पीटल, उमेद इलेक्ट्रनिक्सचे समोर ,सर्व्हीस रोडवर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
   **District(State)** (जिल्हा(राज्य)):



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजु लक्ष्मण पवार

(b) **Guardian's Name** (पालक चे नाव) : लक्ष्मणपवार

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 82,कल्याण नगर,भाग 2,सोलापुर, नर्थ हल्ली रा 1804,सिल्वर ग्रेसीया, रावेत पुणे ,भोसरी एम.आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 82,कल्याण नगर,भाग 2,सोलापुर, नर्थ हल्ली रा 1804,सिल्वर ग्रेसीया, रावेत पुणे ,भोसरी एम.आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8999023658

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मारुती महादेव चोरमले | | पालक का नाम : महादेव चोरमले | 1. गंधर्व नगरी पी/8,सोसायटी तापकिर नगर,मोशी जि पुणे , भोसरी एम.आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | जयेश बाळासाहेब बारमुख | | पालक का नाम : बाळासाहेब बारमुख | 1. बारमुख वस्ती चांदखेड,मावळ , भोसरी एम.आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):



Scanned with CamScanner

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

गु.र.नं./ कलम - 407/2025 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7, 7अ, 12 प्रमाणे
फिर्यादी जबाब दि.16/07/2025

मी राजु लक्ष्मण पवार वय 46 वर्षे व्यवसाय- टुर्स ट्रॅव्हल्स कंपनी,मुळ रा 82,कल्याण नगर,भाग – 2, सोलापुर नॉर्थ हल्ली रा 1804,सिल्वर ग्रेसीया,रावेत पुणे मो.क्र.8999023658.
समक्ष हजर राहुन जबाब देतो कि “माझी बहिण जयश्री मधुकर राठोड व इतर 21 जण यांनी बिल्डर श्री पुर्णचंद्र सनातन स्वाईन यांचेकडुन मौजे मावळ कुसगाव येथील गट नं 209 मधील 38 गुठंयाचे क्षेत्र विकसन करारनामा सन 2018-2019 मध्ये करुन घेतले आहे.

नमुद क्षेत्राचा विकसन करारनामा झालेला असतानासुध्दा बिल्डर श्री पुर्णचंद्र सनातन स्वाईन यांनी सदर जमीन तन्मई सावंत यांना दि.12/02/2025 रोजी खरेदीखत करुन देवुन विकली आहे. स्वाईन खरेदी खत करण्यास टाळाटाळ करीत असल्याने माझी बहिण व इतर 21 यांना शंका आल्याने मार्च 2025 मध्ये सदरबाबत सर्च रिपोर्ट काढुन खात्री केली असता, मला सदरची जमिन तन्मई सावंत यांना विकल्याचे आढळुन आले. फसवणुकीबाबत आणि श्रीमती सावंत यांचे फेरफार नोंदीकरीता हरकत असलेबाबत हरकतीचा अर्ज माझी बहिण आणि इतर 21 जण यांनी मंडल अधिकारी शिवणे श्री चोरमले यांचेकडे दि.28/04/2025 रोजी केला आहे. माझी बहिण व इतर 21 जण यांनी वर नमुद मिळकतीबाबत कोर्ट तसेच सरकारी कार्यालयात जावुन कामे पाहणेकरीता माझी कुलमुखत्यार धारक म्हणुन 02/05/2025 रोजी रजिस्टर नोटरीदवारे नेमणुक केली आहे.

सदर प्रकरणाची सुनावणी श्री चोरमले मंडळ अधिकारी हे घेत असुन 04 सुनावणीला मी स्वत: हजर होतो. त्यावेळी मी माझे कामाबाबत मंडळ अधिकारी चोरमल व बारमुख याचेशी बोलणे केलेले होते.परंतु दरवेळी पुढील तारखा दिल्या.दि.25/06/2025 रोजी मला मंडल अधिकारी श्री चोरमाले यांनी त्यांचा मो न 8830916253 यावरुन माझे मोबाईल वर कॉल करुन जिल्हा अधिकारी कार्यालय पुणे येथे बोलावुन घेतले आणि अणि तेथे मी एकटाच गेलो.तेथे सांगितले कि, बिल्डर श्री स्वाईन यांनी वर नमुद जमिन तन्मई सावंत यांना विकल्याने नोंद झालेला फेर फार रद्द करणेसाठी तसेच नमुद जमिन यांचे सातबारा सदरी माझी बहिण व इतर 21 यांची फेरफार नोंद करणेसाठी मदत करतो त्याकरीता मला दोन लाख रुपये दे असे बोलुन श्री चोरमले यांनी माझेकडे पैशाची मागणी केली आहे.

त्यानंतर सदर कार्यालयातील (मंडळ अधिकारी शिवणे) काम करणारा श्री बारमुख यांनी दि.30/06/2025 रोजी त्याचे मोबाईल क्रमांक( 8407942611,7972747998 ) यावरुन माझा मोबाईल क्रमांक 8999023658 यावर कॉल करुन गट नं 209 चे क्षेत्र तन्मई सावंत यांनी खरेदी केल्यामुळे नोंद झालेला फेर फार श्री चोरमले रद्द करतील त्यामुळे श्री चोरमले यांना दोन लाख रुपये दयावे लागतील व मला त्याचे वेगळे पैसे दयावे लागतील असे बोलुन माझेकडे पैशाची मागणी केली परतु त्यावेळी माझे आईचे दवाउपचार मुंबई येथे सूरु असलेने मी त्यात व्यस्त होतो.

मंडळ अधिकारी शिवणे श्री चोरमाले यांनी व श्री बारमुख यांनी मागणी केलेली रक्कम हि कुठलीही शासकिय फी नसुन लाचेची मागणी आहे.श्री चोरमले, मंडल अधिकारी शिवणे व श्री बारमुख यांचेशी माझे कोणतेही आर्थिक व्यवहार नाही तसेच पैशाची देवाण घेवाण नाही. मला श्री चोरमाले ,मंडल अधिकारी, शिवणे व श्री बारमुख यांना



Scanned with CamScanner

लाच रक्कम देण्याची इच्छा नाही तरी त्यांच्याविरुदध कायदेशीर कारवाई व्हावी याकरिता दिनांक 14/07/2025 रोजी पोलीस उप अधिक्षक गावडे साहेब लाललुचपत प्रतिबंध विभाग पुणे येथे 11.00 वा माझे तक्रारीबाबत माहिति दिली.

माझ्या तक्रारी नुसार श्री. गावडे, पोलीस उप अधीक्षक यांनी एका अधिका--यास आपले दालनात बोलवुन घेतले मला त्यांचे नाव पोलीस निरीक्षक सुहास हट्टेकर, लाप्रवि पुणे असे सांगुन त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगुन, शासकीय पंचांना पत्र देवुन बोलवुन पुढील कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर 12:00 वा. सुमारास पोनि हट्टेकर मला त्यांचे कक्षात घेवुन गेले. त्यावेळी मी त्यांना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगुन, मी माझे स्वहस्तक्षरामध्ये लिहलेला तक्रारी अर्ज सादर केला. त्यानंतर 13:30 वा. सुमारास प्रादेशिक परिवहन विभाग पुणे येथील दोन शासकीय पंच पोनि हट्टेकर यांचे कक्षात हजर झाले. पोनि हट्टेकर यांनी माझी आणि पंचांची ओळख करुन देवुन त्यांची नावे 1. सौ अंबिका संजय जाधव वय 40 वर्ष व्यवसाय - नोकरी, पद – लिपीक टंकलेखक प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे रा.104, जे पी पर्ल टिंगरे नगर विदया नगर पुणे मो न 8208248202 2. श्री पवन चंद्रकांत माने वय 38 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद – लिपीक टंकलेखक प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे,रा.415/2, अ श्राईन कॉम्पलेक्स झेड बिल्डींग तिसरा माळा सोमवार पेठ पुणे मोबाईल नंबर 8446550191. असे असलेबाबत सांगुन पोनि हट्टेकर यांनी मी केलेल्या तक्रारी अर्जाची थोडक्यात माहिती दिली. मी पंचांना माझी तक्रार कथन केली त्यानंतर तक्रारदारानी माझी लेखी तक्रार वाचली ,मी कथन केल्याप्रमाणे सदरची तक्रार असलेची पंचाची खात्री झालेवर पंचानी व पोनि हट्टेकर यांनी त्यावर स्वाक्षरी केली. त्यानंतर पोनि हट्टेकर यांनी मला पुढील पडताळणी कारवाई बाबत विचारणा करता, मी "लोकसेवक श्री. चोरमले यांचे कार्यालयातील श्री बारमुख यांनी मला कार्यालयात येण्यापुर्वी फोन करुन या असे सांगितले होते.त्यामुळे मी श्री बारमुख यांना फोन करून कार्यालयात येण्याबाबत विचारतो असे सागितले. त्यावेळी लाप्रवि कार्यालयातुन फोन करण्याचे ठरवून आम्हाला सुचना देण्यात आल्या.

सदरचा कॉल करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर 15:01 वा. सुमारास श्री. बारमुख यांचा मोबाईल क्र. 8407942611 यावर माझा मो न 8999023658 यावरुन फोन करुन फोनचा स्पीकर ऑन करुन बोलणी केली. माझेत व जयेश बारमुख खाजगी इसम यांचेत्यांचेत दोन्ही पंचासमक्ष बोलणे झाले.सदर फोनवरील संभाषणादरम्यान, मी खाजगी इसम बारमुख यांना "दोन लाख कुठन दयायचे सरं" असे बोललो असता त्यावर खाजगी इसम बारमुख यांनी, मला " दोन लाख,दोन लाख सांगतातायत नाएका, कुठल्या हिशोबानी सांगितल माहीतये का प्रत्येकाचे पाच हजार रुपये हिशेबानी असे सांगितलें" असे बोलले, मी त्यांना मंडल अधिकारी कार्यालयात येवु का अशी विचारणा केली असता त्यांनी उया या साहेबाना भेटा असे सांगितले. सदर कॉल डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड करण्यात आला आहे.त्यामुळे दिनांक 14/07/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.पुढील कारवाई दिनांक 15/07/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.मला दिनांक 15/07/2025 रोजी कारवाई करिता 14.00 वा सोमाटणे फाटा येथे हजर रहण्याबाबत सुचना दिली. मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक 15/07/2025 रोजी सोमाटणे फाटा येथे लोकसेवकाचे कार्यापासुन दूर अंतरावर असलेने माझे चारचाकी वाहन क्र MH 12 XM 9404 हीचेसह 14.12 वा हजर झालो तेव्हा सापळा पथक सरकारी वाहनाने मी थांबलेल्या ठिकाणी आले. तेव्हा 14.15 वाजले होते.तेथे मला सापळा पथकातील अधिकारी ,यांनी पंच व इतर स्टाफ यांची ओळख करुन देवुन कारवाईचे अनुषंगाचे सुचना व माहीती दिली. प्रथमत माझे व क्र 1 सौ जाधव मॅडम यांचे निवेदन घेण्यात आले. व श्री बारमुख यांना त्याचा मोबाईल 8407942611 यावर पंचासमक्ष मी कॉल करुन कार्यालयात येण्याबाबत व लोकसेवक कार्यालयात आहेत का याबाबत विचारणा केली असता त्यांनी साहेब आहेत असे सांगितले. सदरचा कॉल डिजीटल व्हाईस रेकॉडरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला आहे. त्यावेळी 14.58 वाजले होते.त्यानंतर पोनि हट्टेकर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टाचे आतील बाजूस बनियनला छातीवजळ लावुन मला पंच क्र 1 सौ जाधव मॅडम यांचेसोबत मडळ अधिकारी कार्यालय शिवणे ता मावळ येथे पडताळणी कामी रवाना माझे चारचाकी वाहन MH 12 XM 9404 यातुन रवाना केले ती वेळ 15.42 अशी होती.

मी व पंच क्र 1 सौ जाधव मॅडम लोकसेवक श्री चोरमले व खाजगी इसम बारमुख यांचे मंडळ अधिकारी कार्यालयात गेलो तेथे श्री चोरमले व बारमुख हजर होते. लोकसेवक चोरमले साहेब बसलेले होते तेथे बारमुख देखील हजर होते. त्यांचेकडे कामाबाबत बोलणी केली असता व आता सांगा ना "साहेब कस करायच" अस विचारले असता लोकसेवक चोरमले यांनी "कस ठरलय ..मजा नाही. " असे सांगितले तेव्हा मी श्री बारमुख यांना तेथेच बाजुला घेवुन बोलले असता बारमुख यांनी "दोन गटाचे वेगवेगळे असे दोन लाख वीस हजार सांगतात असे सांगितले. "त्यानतर तक्रारदार यांनी चोरमले यांना सांगितले कि वकील सांगत होत चोरमले साहेब सहकार्य करतात. तेव्हा लोकसेवक चोरमले यांनी



Scanned with CamScanner

"वकील म्हणून काय उपयोग मला सहकार्य पाहीजे" असे सांगितले. तक्रारदार यांनी लोकसेवक चोरमले यांना आम्ही तुम्हाला दोन लाख देतो पण त्याला आम्हाला थोडासा जेवढे गोळा केलेत तेवढे घ्या" असे बोलेलो असता लोकसेवक चोरमले यांनी सांगितले कि, "लगेचच करायच सगळ त्यानंतर मी लोकसेवक चोरमले यांना "का सर करुन टाका मग दोन मध्ये हमम "असे सांगितले असता लोकसेवक चोरमले "मी भाव केलाय का तुम्हाला". तक्रारदार यांनी लोकसेवक चोरमले यांना पैसे कमी करण्याबाबत बोलेले असता " हम्म " असा प्रतिसाद दिला. त्यावेळीच मी चोरमले साहेबांना "दोन लाख घ्या म्हणत होतो साहेब" असे बोलेलो असता लोकसेवाक चोरमले यांनी "ह..आजच होवु दया असे सांगितले.लोकसेवकाने त्यावेळी पंच क्र 1 जाधव मॅडम यांना टेबलजवळ बोलावुन घेवुन नाव पत्ता विचारुन घेतला. "मी त्यांना पैसे कॅश किंवा आनलाईन दयायची याबाबत बोललो असता लोकसेवकाने मला सांगितले कि भोसरी मध्ये यायच साडे सहा वाजता मला कॉल कर कस यायच कुठ यायच" असे सांगितले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो तेव्हा 16.31 वाजले होते. त्यावेळी पोनि हट्टेकर यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बद करुन विचारणा केली असता मी वरील प्रमाणे हकीकत सांगितली.पंच क्रमांक यांनी देखील माझेप्रमाणेच हकीकत सांगितली.

सदर पडताळणीमध्ये लोकसेवक चोरमले यांनी स्वत करिता माझेकडे 200000/ रू पैशाची मागणी करून सदर रक्कम घेवुन भोसरी परिसरात येवुन 18.30 वा चे सुमारास त्यांना कॉल करण्यास सांगितले. तसेच बारमुख याने देखील साहेबाकरिता 2,00000/ रु करू टाका असे सांगितले आहे.

लोकसेवकाने मला लाचेची रक्कम भोसरी मध्ये कोठे घेवुन यायची याकरिता 18.30 वा कॉल करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंचासमक्ष मी माझा मो क्र 8999023658 वरुन लोकसेवक श्री चोरमले यांचा मो न 8830916553 यावर स्पीकर ऑन करून 18.46 वा कॉल केला असता त्यांनी मला स्पाईन रोड भोसरी येथे येण्याकरिता सांगितले व मला व्हाटसअपवर लोकेशन देखील पाठविले. त्याप्रमाणे आम्ही सर्व सापळा पथक भोसरी अँकार्ड हॉस्पीटल चे समोर सर्व्हीस रोडचे बाजूला जावुन थांबलो. सदरवेळी पथकामध्ये नव्याने पोनि जाधव हे देखील सामील झाले पोनि हटटेकर यांनी त्यांची सर्वांना ओळख करुन दिली.

पुढील कारवाईकरिता शासकीय वाहनात बसले असताना मला लाच रक्कम हजर करणेबाबत सांगिलते असता मी माझे बचतीमधुन लोकसेवकाला दयावयाची 200000/रू लाचेचे रक्कमेपैकी आणलेली रक्कम ही 99500/-रु सादर केली. त्यात 500रु दराच्या 199 नोटा रोख होत्या.व माझेकडे उर्वरित लाच रक्कम उपलब्ध नसलेचे सांगितले असता पोलीस पोनि हटटेकर यांनी कारवाईकरिता सोबत असलेल्या खेळण्यातील नोटा वापरण्याचे ठरवले. तेव्हा शासकीय वाहनामध्येच बसुन त्यानुसार पोनि हट्टेकर यांनी दोन्ही पंच व मला अँथ्रासीन पावडर व अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले व प्रात्यक्षिक दाखविले .तेव्हा गाडीत पडदे लावुन सर्वांचे हात तपासले असता कोणाचेही हातावर अॅन्थ्रेसीन पावडर दिसुन आली नाही.तेव्हा मी नोटा जर केल्या त्यात 500/- रु. दराच्या भारतीय चलनातील 199 ख--या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्या नोटांना चालक जाधव यांनी अॅन्थ्रॉसिन पावडर लावून सदर नोटा केसरी रंगाचे 2 लिफाफयात ठेवुन त्यावर देखील अॅन्थ्रॉसिन पावडर लावली.व अॅलट्राव्हायलेट दिव्यात अँथ्रसीन पावडर लावलेल्या नोटा व लिफाफे दाखविले त्यावर चकाकी दिसुन आली.व ते सदर लाच रक्कम असलेले लिफाफे माझेकडे दिले असता ते मी माझे हातात ठेवले. त्यानंतर चालक जाधव यांना सापळा कारवाईत सामील करण्यात येणार नसलेचे सांगितले.

सदरची लाचरक्कम लोकसेवक श्री. चोरमले यांना देणेकरीता जाताना पोनि हट्टेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टचे आतील बाजुस बनियनला कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने सेफ्टी पिनचे मदतीने लावुन पंच नं 1 यांचेसोबत भोसरी अँकॉर्ड हॉस्पीटल जवळ उमेद इलेक्ट्रानिक्स समोरील सर्व्हीस रोड माझे हयुडाई औरा कार क्रमांक MH 12 XM 9404 यामध्ये पंच क्रमांक 1 सौ जाधव मॅडम सह रवाना केले. ती वेळ 19.56 अशी होती. त्यावेळी मी गाडी चालवताना हातातील लाचेची रक्कम गाडीचे हॅन्ड बेक जवळ ठेवली होती. लोकसेवक यांना लाच रक्कम देण्याकरिता माझे कारमध्ये बसुन राहण्यास सांगुन सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा करण्याबाबत सांगितले होते. आमचे पाठोपाठ पोनि हट्टेकर पोनि जाधव व उर्वरीत सापळा पथक, पंचासह चालत येवुन माझे कारचे आजुबाजूला काही अंतरावर थांबुन राहीले.

काही वेळाने 19.52 वा मी लोकसेवक याना कॉल करुन कोठे आहे याबाबत विचारणा केली असता त्यांनी उमंग इलेक्ट्रानिक्स येथे असलेचे सांगितलेने मी गाडीचे बाहेर येवुन त्यांना आवाज दिला ते चालतच माझे गाडीजवळ आले व मी त्यांना गाडीत पुढे बसण्यास सागितले व पंचास मागील सीटवर बसण्यास सांगितले. त्यांनतर यांना पंचासमक्ष मी लोकसेवकांचे समोर लाच रक्कम असलेले लिफाफे हे एक लाख हे एक लाख असे बोलून क्रमाने धरले असता लोकसेवक त्यांनी ती दोन्ही हाताने स्वीकारुन त्याचे हातामध्ये धरुन लिंफाफे माडीवर ठेवल्यावर मी पुर्वनियोजित ठरल्याप्रमाणे कारचे हेड लाईट चालू करुन सापळा पथकास इशारा केला. त्यावेळी पोनि हट्टेकर,आणि पथक हे माझे



Scanned with CamScanner

कारवजवळ येवुन त्यांनी लोकसेवक श्री. चोरमले यांना त्यांची ओळख सांगुन पंचासमक्ष ताब्यात घेतले. सदरवेळी पोहवा शिंदे यांनी माझे कडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 20.20 अशी होती.
त्यावेळी पोनि हट्टेकर यांनी लोकसेवक श्री. चोरमले यांना लाच रक्कम काढून देणेबाबत सांगितले असता त्यांनी त्याचे हातीतील लाच रकमेचा एक लिफाफा समोरील डॅश बोर्डवर टाकले.व एक लिफाफा समोरील ड्रॉवरमध्ये टाकला. त्यावेळी पोनि हट्टकर यांचे सुचनेनुसार मपोशि /शेटे यांनी त्याचे जवळ असलेला व्हिडाओ कॅमेरा चालू करुन कारवाईचे व्हिडीओ रेकॉर्डिंग केले. त्यांनतर लोकसेवक श्री. चोरमले यांनी त्यांनी गाडीत समोर ठवेलेली लिफाफे काढून दिले.त्यावेळी पोनि हट्टेकर यांनी पंच क्र.2 श्री माने यांना सदर रक्कम ताब्यात घेण्यास सांगुन ताब्यात घेतलेल्या नोटांवरील क्रमांक व सापळापुर्व कारवाई दरम्यान पंच क्र.2 श्री. माने यांचे ताब्यात नोट क्रमांक लिहून दिलेला कागद यावरिल नोटांचे क्रमांक हे एकच आहेत का? याबाबत खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच क्र.2 माने यांनी त्यांचेकडील कागदावर लिहलेल्या क्रमांकाशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर पोनि हट्टेकर यांनी गाडीतील लाईट बंद करुन अंधार केला. सदर अंधारामध्ये लोकसेवक श्री. चोरमले यांचे हात व हस्तगत केलेली रक्कम अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासले असता लोकसेवक श्री. चोरमले यांचे दोन्ही हाताचा तळ हात, बोटांचे पे--यांवर तसेच त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टचे उजव्या मांडीवर,दोन केसरी रंगाचे लिफाफयावर लाच रकमेवर अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली तसेच पंच क्र.2 श्री. माने यांचे हातांचे बोटांवर व तळहातास अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर पोनि हट्टेकर यांनी पंचासमक्ष माझे दोन्ही हात, पॅन्टचे पुढील बाजुचा उजवा खिसा तसेच शर्टचे पुढील खालील बाजुस यावर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्यावर निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर लोकसेवक चोरमले यांचेकडे श्री जयेश बारमुख याचेबाबत विचारणा केली असता त्यांनी जयेश हा त्यांचा खाजगी लेखनीक असलेचे सांगितले. त्यावेळी मी जयेश ला कॉल करीत असलेचे सांगितले असता पोनि हटटेकर यांनी व्हाईस रेकार्डर मध्ये सदरचे संभाषण रेकॉर्ड करत असलेचे सांगितले मी माझे मोबाईलवरुन बारमुख यांचा मो क्र 8407942611 यावर 20.43 वा. कॉल करुन चोरमले साहेबांना त्याचे 200000/ दिलेत तुमचे 10000/ त्यांचेकडे देवु कि तुम्हाला आणून देवु अशी विचारणा केली असता त्यांनी सेप्रेट दया निकाल झाल्यानंतर दया असे सांगितले. सदरचा कॉल व्हाईस रेकार्डमध्ये रेकार्ड करण्यात आला.
त्यानंतर श्री बारमुख यांना पुन्हा कॉल केला असता. त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल क्र 8407942611 यावर 10000/रु त्याचे कॉल केला त्याचा मोबाईल क्रमांकावर ऑनलाईन पाठविण्याकरिता सांगितले त्याप्रमाणे तक्रारदार यांनी 1 रुपया पाठवुन खात्री केली असता बारमुख यांनी पैसे आलेचे सांगितले तेव्हा तक्रारदार यांनी 21.08 वा त्याचे फोन पे वरुन. 10,000/-रु पाठविले व बारमुख यांचे व्हाटसअप ला पैसे पाठविल्याचा स्क्रीनशॉट काढून पाठविला असता त्यांनी नमस्कार असा सिंबॉल पाठविला व लाचेची रक्कम ऑनलाईन स्वीकारली आहे.मी माझे मोबाईलचे स्क्रीन शॉटच्या प्रिट सादर केल्या आहेत

तरी दिनांक 14/07/2025 रोजी 15.01 वाजताची पडताळणी मध्ये खाजगी इमस बारमुख यांनी लोकसेवक चोरमले यांचेकरिता 200000/रु देण्याबाबत प्रोत्साहन दिले असून दिनांक 15/07/2025 रोजी 12.48 वा ते 21.20 वा. चे दरम्यान लोकसेवक श्री मारुती महादेव चोरमले वय 53 वर्ष मंडळ अधिकारी शिवणे ता मावळ जि.पुणे रा.गंधर्व नगरी पी/8, सोसायटी तापकिर नगर मोशी जि पुणे यांनी तक्रारदार यांचेकडे तन्मई सावंत याची फेर फार नोद रदद करणसाठी तसेच तक्रारदार यांची बहीण व इतर 21 लोंकाचे गट क्र. 207 मधिल सातबारा ला नोंद करण्यासाठी माझेकडे 2,00,000/रु ची मागणी केली. तसेच लोकसेवक श्री. चोरमले यांनी लाचेची रक्कम भोसरी येथे घेवुन येण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे भोसरी अँकॉर्ड हास्पीटल,उमेद इलेक्ट्रॉनिक्सचे समोर सर्व्हीस रोडवर लोकसेवक श्री चोरमले यांनी पंच 1 यांचेसमक्ष 2,00,000/रु लाचेची रक्कम स्वीकरली व लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. खाजगी इसम जयेश बाळासाहेब बारमुख वय 33 वर्ष व्यवसाय खाजगी नोकरी रा.मु पो बारमुख वस्ती चांदखेड,ता मावळ जि.पुणे याने मदतीसाठी म्हणून लोकसेवक चोरमले यांचेकरिता 200000/ रकमेची मागणी केली.व स्वतःकरिता देखील वेगळी सेप्रेट पैशाची मागणी करुन ऑनलाईन 10000/रू स्वीकारले आहेत. म्हणुन माझी लोकसेवक मारुती चोरमले व खाजगी इसम जयेश बारमुख त्यांचेविरुदध फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

GANESH Jagannath JAMDAR(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

ठाणे अंमलदार
M.I.D.C., भोसरी पोलीस स्टेशन,
पिंपरी चिंचवड

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): GANESH Jagannath J

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

MIDC भोसरी पोलीस स्टे. पि. चिं. पोलिस आयुक्त

एक प्रत मिळाली



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner